## निशाणी क्र. २३४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १४ याने कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत कामी वादी यांनी दाव्यासोबत सादर केलेल्या वंशावळीमधील काही व्यक्तींच्या नावचे नाडण गावच्या हद्दीमध्ये इतर इमल्याच्या घर कर आकारणी पत्रकाच्या सही शिक्याच्या नकला याकामी न्याय पुर्ततेच्या दृष्टीने आवश्यक आहेत. सदर कागदपत्र उशिरा मिळाल्याने ते दाखल करण्यास उशीर झाला आहे. सबब झालेला विलंब माफ होवून दाखल करीत असलेले कागदपत्र पुराव्यात घ ोणेत यावेत अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही योग्य त्या कारणाशिवाय सदरचे कागदपत्र विलंबाने दाखल करण्यात आले आहेत. अर्जात नमूद केलेले कारण चूकीचे आहे. त्यांनी सुरूवातीलाच हे कागदपत्र मिळवणे आवश्यक होते. नमूद कारण पुरेसे नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादी, प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे मला वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे मला वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास वादींचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर

होणे क्रमप्राप्त आहे असे मला वाटते. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : १६/०१/२०१९